## प्रेस नोट दि. ११/१२/२०१७

## खंडणी विरोधी पथकाकडून सुमारे सव्वा तिन लाखांचा गुटखा जप्त

दि. ०९/१२/२०१७ रोजी खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व कर्मचारी विश्रामबाग पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना महात्मा फुले मंडईजवळील मिसाळ पार्कीगजवळ आले असता, पथकातील पोलीस हवालदार एकनाथ कंधारे व पोलीस नाईक प्रदिप शिंदे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, इसम नामे इब्राहीम मोईद्दीन शेख, वय-३८, रा. रास्तापेठ पुणे याच्याकडे प्रतिबंधीत असलेला विमल व आरएमडी चा गुटखा विक्रीसाठी तिनचाकी मालवाहु गाडीतुन घेवून जात आहे. सदर माहिती ही त्यांनी खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, यांना कळवून त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार वरील नमुद इसमास पकडून त्याच्याकडून किंमत रुपये ३,१८,२५०/- चा प्रतिबंधीत गुटखा जप्त करुन सदरचा मुद्देमाल हा पुढील कारवाईकामी अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी श्रीमती सोनकांबळे यांच्या ताब्यात पुढील कायदेशीर कारवाईसाठी दिलेले आहे.

**वरील कारवाई ही श्री. प्रदिप देशपांडे सो, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, पुणे श्री. समिर शेख सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १ यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, सहा. पोलीस निरीक्षक विठ्ठल शेलार, व पोलीस स्टाफ एकनाथ कंधारे, प्रदिप शिंदे, अविनाश मराठे, शिवाजी घुले, रमेश गरुड, संतोष मते, प्रमोद मगर, सुधीर इंगळे, शिवानंद बोले, मंगेश पवार, नारायण बनकर यांनी केलेली आहे.**